॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १२ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे १५ जणांचे पथक प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात सहभागी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून राज्यस्तरीय निवड चाचणी शिबिरासाठी छत्रपती संभाजीनगरकडे रवाना झाले आहे. दि. १२ ते १४ ऑक्टोबर दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरातून दिल्ली तेथे होणाऱ्या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलनासाठी निवड होण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या पथकासमोर महत्त्वाची संधी उपलब्ध झाली आहे.

राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, रासेयो मंत्रालय कक्ष, मुंबई यांच्या संदर्भीय पत्रानुसार या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी विद्यापीठस्तरीय निवड चाचणी घेण्यात आली. जळगाव, धुळे आणि नंदुरबार या तीन जिल्ह्यांतील जिल्हास्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबिरांमधून प्रत्येकी दहा, तसेच विद्यापीठ परिसरातून दहा अशा एकूण ४० विद्यार्थ्यांमधून अंतिम निवड प्रक्रिया राबविण्यात आली. शारीरिक क्षमता, शिस्त, संचलनातील कौशल्य आणि नेतृत्वगुणांच्या आधारे ७ स्वयंसेवक व ७ स्वयंसेविकांची निवड करण्यात आली. त्यांच्यासोबत एक महिला कार्यक्रम अधिकारी असे एकूण १५ जणांचे पथक राज्यस्तरीय शिबिरात सहभागी होणार आहे.

विद्यापीठातील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम विद्यार्थी भवन येथील राष्ट्रीय सेवा योजना कक्षात प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी सहभागी स्वयंसेवकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आत्मविश्वास, शिस्त, सातत्यपूर्ण सराव आणि संघभावनेचे महत्त्व अधोरेखित केले. निवड चाचणी शिबिरात उत्कृष्ट कामगिरी करून विद्यापीठाचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन करत त्यांनी पथकाला शुभेच्छा दिल्या.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, कुलसचिव डॉ. विनोद पाटील आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. प्रवीण महाले यांनीही पथकातील विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

निवड प्रक्रियेत एनएमसीचे प्रशिक्षक प्रा. शिवराज पाटील, १८ बटालियनचे प्रशिक्षक ओ. पी. बिश्नोई, जळगाव जिल्हा समन्वयक प्रा. राजू गवारे, एनसीसी अधिकारी प्रा. रोहन कोष्टी, एनसीसी प्रशिक्षक सृष्टी पंड्या, संघ व्यवस्थापक डॉ. भाग्यश्री पाटील तसेच वरिष्ठ स्वयंसेवक कीर्ती शिंपी, उन्नती वाला आणि गजानन बोरसे यांनी योगदान दिले.

..............................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १२ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**